Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# शेती व राष्ट्राचा विकास

**शिवाजी दामाजी लहाने**
एम.ए., (म.फुले-डॉ. आंबेडकर विचारधारा)

**प्रस्तावना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या विषयी विकासासाठी विकासाची अर्थनिती कशी असावी, याचे अभ्यासपूर्ण विवेचन करतांना 'स्टेट ॲन्ड मायनॉरिटी' या ग्रंथामध्ये गरीबी हाटवणे, विषयमता निर्मुलन आणि शेषण मुक्ता चा त्रीसुत्रीचा अग्रह धरला आहे. या ग्रंथामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. खाजगी उद्योगाला धक्का न लावता जनतेची उत्पादकता जास्तीत जास्त राहील आणि संपत्तीचे वाटप समानशील होईल अशा पध्दतीने अर्थिक व्यवहाराने नियोजन करणे ही राज्यशासनाची जबाबादारी आहे. राष्ट्रीयकरणाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विरोध नव्हता. याच उत्पादनाची सर्व साधने सरकारच्या हाती एकवटली पाहीजेत. अशी साम्यवादी विचारांची भूमिका त्यांनी घेतली नाही. मर्यादीत राष्ट्रीयकरानांचा त्यांनी परुस्कार केला. शेतजमीन आणि आवश्यक उद्योगंधदे यावर सरकारची सामुदायीक मालकी असावी अशी त्यांची धारणा होती. शेतजमीन आणि अवजड उद्योगधंदे यावर मालकी असावी. शेतजमीनीचे राष्ट्रीयकरण करुन सामुदायिक लागवड करावी आणि उत्पादनाचे लोकशाही पध्दतीने जातीभेद न करता वाटप करावे. म्हणजेच गरिबाना न्याय देता येईल. अशी त्यांचे भूमिका होती. विशेष म्हणजे खाजगी उद्योगाला धक्का लागू नये व व्यक्तिगत प्रेरणाचा संकोच होऊ देता कामा नये. यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भर दिल्याचे दिसून येते.

**सहकार शेती**

भारतातील शेतीची समस्या सोडविण्याचा एक मार्ग म्हणून त्यांनी सहकार शेतीचा पुरस्कार केल्याचे दिसून येते. ऑक्टोंबर १९२७ मध्ये श्री. एफ.जी.एच.ॲन्डरसन यांनी मुंबई कायदे मंडळात अल्पभूधारक मदत विधेयक मांडले. मुंबई राज्यात शेती व्यवसायाला भेडसवणाऱ्या समस्या म्हणजे विस्कटलेली धारण क्षेत्र, धारण क्षेत्रांचे आकारमान यावर उपाययोजना सुचविण्यासाठी प्रस्तुत विधेयक मांडण्या मागील उद्देश होता. उपाय म्हणून त्यांनी या उद्योगात दोन तरतूदी सुचविल्या. एक म्हणजे जमीनीच्या विभाजनावर नियंत्रण दुसरे म्हणजे एक संघ धारण क्षेत्राची विक्री. या विधेयकावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घनाघाती हल्ला केला. भारतातील लहान धारण क्षेत्र आणि त्यावरील उपाय या वरील मताचाच त्यांनी पुर्नउच्चार केला. अन्डरसन यांनी सुचिविलेल्या उपायाचा जर स्वीकार केला तर शेतीवर अवलंबून असलेले असंख्य लोक भूमिहीन होऊन त्यांचे दैन्य व दारिद्र्य अधिक वाढेल असे डॉ. आंबेडकर यांनी प्रतिपादन केले होते. विस्कटलेल्या व लहान धारण क्षेत्राच्या समस्येवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सहकार शेतीचा उपाय सुचविला होता. एका विशिष्ट आकारांची शेती अस्तीत्वांत आनल्यास ॲटॅन्डरसन यांनी मांडलेल्या प्रस्तुत विधेयकाला अभिप्रेत असणारी उद्दिष्ट्ये साध्य करता येतील. मुख्य म्हणजे आपल्याला छोट्या शेतकऱ्यांना त्यांचा विनाशापासुन वाचवितात येईल. सहकारी शेतीमुळे शेतकऱ्यांचा जमिनीवरील मालकी हक्क अबाधित राहील. अर्थात लागून असलेल्या धारण क्षेत्रांना जोडल्या शिवाय त्याला आपले धारणक्षेत्र कसण्याची मुभा असणार नाही. अशा तरतूदीमुळे लागवडीखालील एकूण जमीन प्रभावित अकारमानाइतकी किंवा त्याहूनही जास्त होईल.

**सामुदायिक शेती**

१९४६ साली ऑल इंडिया शेड्युलकास्ट फेडरेशनच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समितीला जो मसूदा सादर केला होता, जो राज्य आणि अल्पसंख्यांक या नावाने प्रसिध्द आहे. या मुसद्यात जशी अल्पसंख्यांकांच्या आणि विशेषशत: अस्पृश्याच्या संरक्षणाची एक योजना अंतभूर्तत होती. तशाच स्वतंत्र भारताच्या एकूण आर्थिक पुनर्रचनेचा आराखडाही सादर करण्यात आला होता. सदर योजनेचा थेट राजकिय लोकशाहीच्या स्वरुपाशी संबंध होता. राजकिय लोकशाही ही मुख्यत: चार मुलभूत प्रमेयावर आधारलेली असल्याची आंबेडकरांची धारणा होती. १) व्यक्ती हे एक स्वयंभू मुल्य आहे २) व्यक्तीला काही हिरावून घेता येणार नाही. असे मुलभूत अधिकार असताता आणि राज्यघटनेने अशा अधिकारांची हमी दिलीच पाहीजे ३) कोणत्याही प्रकारचा फायदा व

लाभ यासाठी व्यक्तीला आपला घटनात्मक अधिकार गमवावा लागता कामा नये. ४)दुसऱ्यावर हुकूमगाजविता येईल अशा प्रकारची कोणतीही सत्ता (अधिकार) शासनसंस्था खाजगी व्यक्तीला देता कामा नये.

अशा प्रकारचा राजकिय लोकशाहीचा आशय अभिप्रेत असल्यामुळे समाजाच्या आर्थिक व्यवहारात शासन व संस्थेचा अगदी कमीत कमी हस्तक्षेप असावा असा युकतीवाद करणाऱ्या घटना तज्ञांनी आंबेडकरांचे मतभेद होते. शासन संस्थेपासून जे मुक्त असते ते स्वातंत्र्य अशी जरी त्यांची धारणा असली तरी राजकिय लोकशाहीचा गंभीरपणे विचार करणाऱ्या अभ्यासकासमोर ते लगेचच एक मूलभूत प्रश्न उभा करतात. ते म्हणतात, "कुणाचे स्वातंत्र्य आणि कशासाठी स्वातंत्र्य".

दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे राजकीय लोकशाही प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी तीला आर्थिके लोकशाहीची जाडे असलीच पाहीजे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आग्रही प्रतिपादन होते. त्यासाठी त्यांनी आर्थिक क्षेत्रात शासन संस्थेच्या हस्तक्षेपाचा पुरस्कार केला. त्यांचे म्हणणे असे की, जर शासन संस्थेने समाजातील आर्थिक व्यवहाराचे नियमन केले नाही. तर खाजगी मालकांना ते करावेच लागेल अशा परिस्थितीत खाजगी मालक स्वत:च्या स्वातंत्र्याचा उपयोग दुसऱ्यावर अधिसत्ता गाजविण्यासाठी करतील. जर शासन संस्थेने आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप करुन त्यावर नियंत्रण ठेवले नाही. तर जमीनदार कुळावर जबर खंड बसवितील आणि भांडवलदार कामगारांचे कामाचे तास वाढवून वेतन कमी करण्यासाठी आपले स्वातंत्य हे खाजगी मालकांच्या हुकूमशाहीचे दुसरे नाव होय. आर्थिक लोकशाहीचे स्वप्न साकार करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी विशेषत: उद्योग व शेती क्षेत्रात शासनसंस्थेच्या हस्तक्षेपाचे समर्थन केले. त्या अनुषंगाने त्याच्या सामुदायिक शेती विषयक विचारांचा मागोवा घेण उचीत ठरेल. राज्य आणि अल्पसंख्यांक या मसुद्यात विवेचन केल्या प्रमाणे शेती हा शासकिय उद्योग असावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. मुलभुत उद्योग आणि शेती हा व्यवसाय राष्ट्राच्या मालकिचा असावा जेणे करुन भारतातील शेतीचे होणारे तुकडी करण थांबवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुचविलेले राष्ट्रीय धोरण राष्ट्राच्या हिताचे होते.

कारण, डॉ. बाबासाहेब आंबेडकरा यांनी देशातील शेतकरी मजूर, कष्टकरी हा आर्थिक परिस्थिती पडला नाही पाहीजे. यासाठी शेतीचे तुकडे करण बांबवावे त्यांना शंतीला उद्योगाचा दर्जा देण्यासाठी सरकारने मदत करावी. सरकारने शेतीला चालणा देण्यासाठी व शेतीला पुरक व्यवस्था उभी करावी. उद्योग धंद्याची उभारणी करण्यासाठी ग्रामीण भाग हा केंद्र मानावा जेणेकरुन खेड्यातील मजूर वर्गाचे स्थलांतर थांबेल. त्यांना जाग्यावर रोजगार मिळाल्यावर शहरी करणामध्ये उद्भवणारे लोकसंख्याचे प्रमाव थांबेल. शहरात होणारी झोपडपट्टी मध्ये होणारी वाढ बकाल आवस्था ही सुध्दा थांबेल. शेतकरी जर केंद्र स्थानी मानला व आर्थिक विकसासाला गती देण्या ाठी शेतीला पुरक गोष्टीचा सकरकारनेच पुरवठा करावा शेतीला पाण्याची व्यवस्था करण्यासाठी जलसंधारणाची व्यवस्था सरकारने करावी. खतासाठी बी. बियाने यासाठी सरकारनेच अर्थपुरवठा करावा. होणारे उत्पन्नाचे समान वाटप करतांना शेतकऱ्यांना परवडेल असे धोरण ठरवावे. यामुळे होणारे परिणाम हे देश हिताचे ठरले हे जर सरकारने राबवले तर या देशातील शेतकरी, मजूर यांची प्रगती होईल. त्याचा विकास होईल व त्यातून राष्ट्राचाही विकास आपोआपच होईल.

त्यासाठी पुढे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रीय उद्योग धंद्या विषयी आपले मत मांडताना १९५२ तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरॅ यांच्या मंत्री मंडळाला व राष्ट्राला उद्देशुन संसदेमध्ये भाषण करतांना म्हणटले होते. देशाच्य प्रगतीचा विचार करतांना व देशाची आर्थिक परिस्थितीचा विचार करतांना जे तोट्यात चालणारे सरकारच्या मालकीचे उद्योग धंदे हे सरकारने विकून टाकावेत व जे उद्योग धंदे नफ्यात चालतात ते सरकारने ताब्यात घेवून चालवावेत. जेणे करुन राष्ट्राच्या विकासाचय हिताच्या दृष्टिने फायद्याचे ठरेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले शेतीविषयी विचार मांडताना म्हटले आहे की, देशाच्या विकासा करिता जमीनीचे राष्ट्रीयकरण करावे. त्याप्रमाणे उद्योग धंद्या विषयी विचार सुध्दा मांडले आहे.

शेतकऱ्यांनी पारंपारिक पध्दतीने शेती न करता आधुनिक पध्दतीने शेती करावी म्हणुन त्याकरीता काही महत्वकांशी योजनादेखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सुचवितात दामोधर नदी प्रकल्प नद्याजोड प्रकल्प व सिंचन प्रकल्प या त्यांच्या बुध्दी सामर्थ्यातुन आवतरलेल्या फार महत्वाच्या योजना होत्या. याच बरोबर त्यांचा असा अग्रह होता. शेतीसाठी मुबलक व स्वत: दरात विज उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यांना बाजारपेठेमध्ये आपला उत्पादन केलेला माल बाजारपेठेपर्यंत नेण्यासाठी चांगल्या रस्त्याची सोय करण्यात यावी. मजबुत रस्ते बांधण्यात यावे. असे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते. शेती व तिच्यासाठी लागणारी सिंचन व्यवस्था ही उद्योग पुरवठा इत्यादीच्या मानवतावादी दृष्टिने व्यवस्थापन केलेले नाही. तर येणाऱ्या काळात आमचा शेतकरी आत्महत्या करेल त्याची भिती आज सुध्दा दुर्देवाने खरी ठरत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेतीला इंडस्ट्रिचा दर्जा देतात. पण सरकार कृषि क्षेत्रात किती गुंतवणुक करते यावर काही गोष्टी अवलंबुन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्य घटनेच्या कलम (३३) अंतर्गत शेतकऱ्यांसाठी खास लवाद निर्माण करण्याची तरतुद केली आहे. या लवादाच्या माध्यमातुन शेतकरी आपल्या मालाचा भाव स्वत: ठरवु शकतील, परंतु दुर्देवाने असे की, आता पर्यंत आमच्या देशात शेतकऱ्यांसाठी असा लवाद निर्माण करण्यात आलेला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त दलितांचे पुढारी किंवा दलितांचे नेते म्हणुनच इथल्या समाज व्यवस्थेने त्यांच्याकडे बघितले आहे हे खऱ्या अर्थाने भारत देशाचे दुर्देव आहे. शेतकऱ्याशी त्यांचा काही एक संबंध नाही असा गैरसमज करुन आमच्या देशाचे भरपुर नुकसान करुन घेतले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विकासा संदर्भी वैचारिक भुमिकाची चर्चा करतांना आर्थिक विकासासंबंधी त्यांनी १९१८ साली लहान "शेतकऱ्यांच्या समस्या व त्यावरील उपाय" या महत्वपुर्ण लेखनात प्रथम मांडणी केली व हीच भुमिका त्यांनी पुढेही मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते अल्पभुधारक शेतीवर आधारीत भारतीय शेतीची उत्पादकता व उत्पन्न कमी असण्याचे मुख्य कारण शेतीमध्ये अल्प भांडवली गुंतवणुक हे होय. मजुरांच्या तुलनेने भांडवलाचा वापर अधिक अपुरा होता. व त्यामुळे मजुर व भांडवल हे उत्पन्नाच्या दोन प्रमुख घटकांचा शेती मधील वापर असमान होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते शेतीवरील अतिरिक्त भार हा मजुरांना बिगर शेती व्यवसायात रोजगार न मिळाल्यामुळे आहे. उत्पन्न वाढविण्यासाठी औद्योगिकीकरण हा एकमेव उपाय आहे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भुमिका मांडली होती. औद्योगिकीकरणामुळे शेतीवरील मजुरांचा भार कमी होईल. त्यामुळे दरडोई जमिन क्षेत्र वाढवुन दरडोई उत्पन्न, बचत वाढेल व भांडवली गुंतवणुक वाढेल. व शेती ही अस्थिरतेच्या चक्रव्युहातुन बाहेर पडेल. आधुनिकीकरणाच्या मार्गावर वाटचाल करेल.

श्रमिक व गरिब यांना आर्थिक सुरक्षितता देण्यास भांडवल शाही अर्थव्यवस्थेला काही मर्यादा पडतात ही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भुमिका होती. देशाच्या नियोजनबध्द आर्थिक विकासात श्रमिक आणि गरिब शेतकरी यांना महत्वपुर्ण स्थान असावे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. नियोजनबध्द आर्थिक विकासात सामान्य मानसांच्या गरजा उदा. शांतता, निवारा, पुरेशे वस्त्र, शिक्षण, चांगले आरोग्य आणि समानतेचे अधिकार इत्यादी समाधानकारकपणे मिळवण्यासाठी राज्याने नियोजनात योग्य तरतुद करावी ही भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबडकर यांनी शेतीच्या राष्ट्रीय करणा विषयी आपले मत मांडताना शेतकरी, कष्टकरी मजूर यांच्या विकासासाठी प्रगतीसाठी विचार मांडताना जसा गरीब समाजा विषयी त्यांना प्रगत करण्यासाठी लागणाऱ्या सुविधा सरकारने पुरवाव्यात. उद्योग धंद्याची सुरुवात करताना शंतीवर आधारित उद्योग धंद्याची निर्मिती करावी शेतीचे राष्ट्रीय करण करुन शेतीला उद्योगाचा दर्जा द्यावा. रोजगार निर्मिती करिता असतांना ग्रामिण माणूस हा सुखी झाला पाहीजे त्यांना जाग्यावर रोजगार मिळाला पाहीजे. यासठी शासन संस्थांची जबाबादारी योग्य रितीने पारपाडली पाहीजे. जर ग्रामिण भागात उद्योगधंद्याची उभारणी झाली तर शहरीकरणावर ताण पडणार नाही. लोकसंख्येचा ताण कमी होईल. झोपडपट्टी मुळे शहराला येणारी बकाळ आवस्था होणार नाही. नफ्यातील उद्योग धंद्यची मालकी सरकारने द्यावी. त्यामुळे होणाऱ्या नफ्यातुन राष्ट्राच्या विकासाला गती मिळेल. त्यातून राष्ट्राचाही विकास होईल असे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेती विशयक विचार मांडले आहे.

संदर्भ :-

१. बी.आर.आंबेडकर-भारतातील लहान जमिन धरणा आणि त्यावरील उपाय.
२. डॉ. बी.आर.आंबेडकर १९४७-राज्य आणि अल्पसंख्यांक
३. डॉ.बी.आर.आंबेडकर १९४६-डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखाण आणि भाषणे.
४. डॉ. बी. आर. आंबेडकर-स्टेट ॲण्ड मायनॉरिटीज
५. जनता १९२७